# <u>सुक्ष्म , लघु व  मध्यम उद्योजकिय ज्ञापन स्विकृतीपत्र प्रदान योजना  २००६</u>

## <u>योजनेचे वैशिष्टे</u>

१. ही योंजना उत्पादन व सेवा वर्गवारीसाठी आहे.

२. यंत्र सामुग्रीत केलेल्या स्थिर भांडवल गुतवणुकीनुसार उद्योगाचे वर्गीकरण पुढील प्रमाणे होते.
अ) उत्पादक ब) सेवा क्षेत्रातील व्यवसाय

३. याबाबत  वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

| प्रकार | उत्पादन<br>संयत्र व यंत्रसामुग्री<br>(जमीन व इमारत वगळता) | सेवा क्षेत्र<br>साधने उपकरणे<br>(जमीन व इमारत वगळता) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| सुक्ष्म | रु. २५ लाखापर्यत | रु. १० लाखापर्यत |
| लघु - | रु. २५ लाखाचे वर व<br>रु. ५ कोटी पर्यत | रु. १० लाखाचे वर व<br>रु. २ कोटी पर्यत |
| मध्यम - | रु. ५ कोटी चे वर  व<br>रु. १० कोटी पर्यत | रु. २ कोटीचे वर व<br>रु. ५ कोटी पर्यत |

४. वरील वर्गीकरणानुसार विहित नमुन्यातील अर्ज भरल्यावर प्रस्तावीत उद्योगांना <u>भाग एक</u> मध्ये तर कार्यरत व उत्पादन सुरु केलेल्या उद्योगाना <u>भाग दोन</u> मध्ये स्विकृतीपत्र नोंदणी करुन दिली जाते.

५. भाग एक साठी मुदत <u>दोन वर्षाची</u> असते व दोन वर्षात उत्पादन सुरु न केल्यास ती व्यपगत होऊन नव्याने अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

६. सदरची सुधारीत योजना ही दि. २ ऑक्टोबंर २००६ पासुन केंद्र शासनाने सुरु केली आहे.

७. जुन्या पध्दतीमध्ये ज्यांनी MSI या वर्गवारीत नोंदणी करुन घेतली आहे व ज्यांना यंत्रंसामुग्रीतील स्थिर गुतवणुक वाढल्याने ज्यांना सुधारित पध्दतीत नोंदणी करावयाची असल्यास ती करुन घेता येईल.

८. व्यापार क्षेत्रासाठी नोंदणीची आवश्यकता नाही.

९. शासकीय विहित सवलती उपभोगण्यासाठी <u>भाग एक</u> व <u>भाग दोनची</u> नोंदणी उपयुक्त ठरते.